# मुंबई विद्यापीठ

REG/ICC/2020-21/2

परिपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड—१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

संदर्भ: १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना—२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य—५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना—२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य—५, दिनांक १५/०३/२०२०

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण—२०२०/प्र.क्र. ६०/२०/ताशि—१ दि. १६/०३/२०२०

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय—२०२०/ प्र.क्र. ३५/१८ (र.व का.) दिनांक १८/०३/२०२०

५) संकिर्ण—२०२०/ प्र.क्र. ६०/२०/ता.शि.—१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९/०३/२०२०

६) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020

७) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 25 March, 2020

८) मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. REG/ICC/2019-20/37 दिनांक ३१ मार्च,२०२०

९) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 15 April, 2020

१०) उशिसं/कोरोना/२०२०/मवि—१/४०९१, दिनांक १५ एप्रिल, २०२०

उपरोक्त संदर्भाकिंत पत्रांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागाकरिता संदर्भाधिन परिपत्रक क्र. १ ते ७ अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली होती व उपरोक्त परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखिल सुचित केले होते.

उपरोक्त संदर्भाकिंत पत्र क्र. ८ च्या अनुषंगाने संबंधित शैक्षणिक विभाग प्रमुख/शिक्षक, विद्यापीठ उपपरिसरे/ मान्यता प्राप्त सर्व संस्थामधील शिक्षकांना दिनांक ०१/०४/२०२० ते १४/०४/२०२० हा कालावधी विद्यापीठाने अंतरिम उन्हाळी सुट्टी म्हणून घोषित केला होता.

मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ९ अन्वये प्राप्त अधिसुचनेनुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढयाच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक १५ एप्रिल, २०२० ते ३ मे, २०२० पर्यंत कामकाज बंद (Lockdown) करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच संदर्भाकिंत पत्र क्र. १० च्या अनुषंगाने उपरोक्त अधिसुचनेतील संबंधित दिशा निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यापीठाला आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने विविध शैक्षणिक विभाग प्रमुख/शिक्षक, विद्यापीठ उपपरिसरे/ मान्यता प्राप्त सर्व संस्थामधील शिक्षकांना सुचित करण्यात येते की उपरोक्त संदर्भ क्र ८ च्या विद्यापीठ परिपत्रक दिनांक ३१ मार्च २०२० अन्वये दिनांक ०१/०४/२०२० ते १४/०४/२०२० घोषित केलेला अंतरिम उन्हाळी सुट्टीचा कालावधी दिनांक ३ मे, २०२० पर्यत वाढविण्यात आलेला आहे.

तद्‌वतच उद्‌भवलेल्या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवून प्रशासकीय विभागप्रमुख /संचालक विद्यापीठ उपपरिसरे/ मान्यता प्राप्त सर्व संस्था व विद्यापीठ अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की दिनांक १५ एप्रिल, २०२० ते ३ मे, २०२० पर्यत विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभाग लॉकडाउन मुळे बंद राहतील. तथापी या कालावधी दरम्यान अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपले घरी राहून (Work from Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे व अधिसुचनेतील संबंधित निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

तथापी, आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित विभाग प्रमुखांकडे सादर करावा. अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, स्वच्छता विभाग (सामन्य प्रशासन विभाग), सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर सेवा) पुरविणा—या प्रशासकीस विभाग प्रमुखांनी या बाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे. शासन परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

या संदर्भात शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणा—या निर्देशांबाबत सर्व संबंधितांना आवगत करण्यात येईल.

मुंबई (डॉ. अजय देशमुख)
१५ एप्रिल, २०२० कुलसचिव

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही करीता :—
सर्व प्रशासकीस विभाग प्रमुख, प्रभारी संचालक, सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, प्रभारी संचालक उपपरिपरे, समन्वयक, आदर्श महाविद्यालये, आरोग्य अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, सुरक्षा अधिकारी आणि अभियांत्रिकी विभाग